# निवासी शाळा स्थापनेत राजकीय व प्रशासकीय भूमिका

**डॉ. शहाजीराव धोंडीराम वारके,**कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी

**प्रस्तावना :-**

शिक्षण हा राष्ट्राचा प्रमुख आधार आहे. शिक्षण व्यवस्था जितकी जनतेस सहज उपलब्ध होईल त्या आधारे शिक्षणातून चांगले नागरिक घडविण्याची प्रक्रिया घडत राहील. भारतीय राज्यघटनेत प्रत्येक भारतीय नागरिकाची मूलभूत कर्तव्ये समाविष्ट आहेत. त्यामध्ये 'मातापित्याने किंवा पालकाने सहा ते चौदा वर्षादरम्यानचे आपले अपत्य किंवा, यथास्थिती, पाल्य याला शिक्षणाच्या संधी देणे' हे कर्तव्ये समाविष्ट आहे. यातून शिक्षणाची जबाबदारी समाजावरही देण्यात आली आहे. भारतीय राज्यघटनेने शासनव्यवस्थेवर शिक्षणाची जबाबदारी देताना राज्य धोरणाची निदेशक तत्वे नमूद करताना त्यामध्ये शिक्षण विषयक बाबींचा उल्लेख केला आहे. कलम ४१ मध्ये 'कामाचा, शिक्षणाचा आणि विवक्षित बाबतीत लोकसहाय्याचा हक्क' नमूद आहे. कलम ४५ मध्ये राज्य, सर्व बालकांसाठी, त्यांच्या वयाची सहा वर्षे होईपर्यंत, प्रारंभिक बाल्यावस्थेतील देखभाल आणि शिक्षण यांसाठी तरतूद करण्याकरिता प्रयत्न करील. अशी तरतूद करण्यात आली आहे. विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधकबुध्दी व सुधारणावाद यांचा विकास करण्याची जबाबदारीही प्रामुख्याने शिक्षण व्यवस्थेवर आहे. राज्याने लोककल्याणाच्या संवर्धनासाठी, समाज व्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्नशील राहीले पाहिजे. शैक्षणिक सुधारणा राबविताना केंद्र सरकार व राज्य सरकार मिळून निवासी शाळांची स्थापना करतात. सैनिक स्कूल, शासकीय विद्यानिकेतन, नवोदय स्कूल, विविध आश्रमशाळा, वसतिगृहे या माध्यमातून प्राथमिक, माध्यमिक शिक्षणाची सुविधा निर्माण करण्यात आली आहे. निवासी शाळा स्थापनेत शासन, लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकारी यांची भूमिका महत्वाची आहे. निवासी शाळामधून स्वयंशिस्त, स्वावलंबन याचे शिक्षण घेत विद्यार्थी घडविण्याचे महत्वपूर्ण कार्य केले जाते. शासकीय शाळांप्रमाणेच खाजगी शाळा निवासी शिक्षणात आपले योगदान देत आहेत. चांगले विद्यार्थी घडविणे हे ध्येय घेवून निवासी शाळा वाटचाल करत आहेत.

**राजकीय व प्रशासकीय सहकार्य –**

लोकप्रतिनिधी व शासकीय अधिकारी हे लोककल्याणाची धोरणे ठरविणे व राबविणे या बाबींचे प्रमुख आधार आहेत. निवासी शाळा सुसंस्कृत पिढी घडविण्याचे केंद्र असल्याने या शाळांची संख्या नियोजनपूर्वक वाढविली पाहिजे. प्रत्येक विधानसभा क्षेत्रात लोकप्रतिनिधींनी एक शासकीय निवासी शाळा निर्माण करण्यासाठी खास प्रयत्न केले पाहिजेत. निवासी शाळांमधून शिकून शासकीय सेवेत अधिकार पदावर अनेक विद्यार्थी सेवेत आहेत. त्यांना या शाळांची गरज व महत्व माहिती आहे. धोरण ठरविताना व धोरणांची अंमलबजावणी करताना याबाबत प्रशासकीय अधिकाऱ्यांनी जागृतता दाखविली पाहिजे. प्रशासकीय निधीचे वितरण करताना लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकारी यांना निवासी शाळांच्या भक्कम वाटचालीसाठी सहाय्य केले पाहिजे.

**निवासी शाळा :- संस्काराची शिदोरी**

माणसाजवळ चांगल्या संस्काराची शिदोरी असली की त्याला ती जीवनभर ऊर्जा देते. चांगले संस्कार व्यक्तीला मानसिकदृष्टया मजबूत बनवितात. चांगल्या दिवसात योग्य दिशेने जाण्याची ताकद देतात तर कठीण काळात मजबुतीने पुन्हा उभारण्याची शक्ती देतात. संस्काराची शिकवण बालपणात कुटूंबात, बालपण व तारूण्यात शाळा-महाविद्यालयात तर जबाबदारीच्या वयात कुटूंब, समाजात मिळत असते. निवासी शाळा ह्या संस्कारक्षम पिढी घडविण्याचे प्रमुख केंद्र आहेत. या शाळांमध्ये विद्यार्थी त्या शिक्षण संस्थेच्या परिसरात राहतात आणि शिक्षण घेतात. या शाळांमध्ये अभ्यासक्रमासोबत, शिस्त आणि सर्वांगीण विकास, स्वावलंबन आणि खेळ, एकत्रित भोजन आणि सहजीवन, निवासी आणि इतर सुविधा दिल्या जातात. गुरूकुल, पब्लीक स्कूल, सैनिक स्कूल, नवोदय स्कूल ते इंटरनॅशनल स्कूल अशा वेगवेगळ्या शिक्षणसंस्था कार्यरत असल्या तरी सर्वच निवासी शाळा स्वयंपुर्ण व संस्कारक्षम विद्यार्थी घडविण्याचे कार्य करत आहेत.

आज पालक सर्वाधिक लक्ष मुलांच्या शिक्षणावर देत असले तरी विद्यार्थी घडविण्याच्या शिक्षण प्रक्रियेत गोंधळाची परिस्थिती आहे. मुले ही कुटूंबाची जबाबदारी असली तरीही ज्या मुलांवर पुढे कुटूंब, समाज व राष्ट्राची प्रगती आणि स्थिरता अवलंबून आहे, अशा या शिक्षण क्षेत्रात सर्वाधिक लक्ष देणे आवश्यक आहे. शहर व प्रसिध्द ठिकाणे या ठिकाणी सुरू असलेली निवासी शिक्षणाची सुविधा ग्रामीण भागात तालुका पातळीपर्यंत पोहचली पाहिजे. विद्यार्थी घडविताना नवनवीन समस्यांवर चर्चा करताना त्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी समस्या निर्माण करणाऱ्या घटकांवर कायद्याचा धाक निर्माण करण्यात समाज यशस्वी झाला पाहिजे. असा सजग समाज शिक्षणाच्या माध्यमातून घडविताना सार्वजनिक सरकारी निवासी शिक्षणाची सुविधा वाढविली पाहिजे. यशस्वी विद्यार्थी घडविण्याचे सामर्थ्य निवासी शाळांमध्ये आहे, पण त्यासाठी शासन व समाज या घटकांनी या उपक्रमाला पाठबळ दिले पाहिजे.

निवासी शाळांमध्ये शिक्षण, खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, स्वावलंबी जीवनाचे धडे दिले जातात. वैयक्तिक स्वच्छता, परीसर स्वच्छता याबाबत जागृतता निर्माण केली जाते. निश्चीत असे दैनंदिन वेळापत्रक तयार करून शिस्तबध्द विद्यार्थी घडविण्याचे कार्य निवासी शाळांमधून सुरू आहे. शिक्षण शासनाच्या व समाजाच्या हातात ठेवताना शिक्षण व्यवस्था ही व्यवसाय न होता ती देशाचे प्रभावी नागरिक घडविणारी व्यवस्था झाली पाहिजे. शिक्षण व्यवस्थेचे प्रतिनिधीत्व निवासी शाळांनी करताना नाविन्यपुर्ण उपक्रम, संशोधन, वैज्ञानिक दृष्टिकोन यासाठी सातत्याने नेतृत्व केले पाहिजे.

निवासी शाळेची उभारणी करताना प्रशस्त हवेशीर जागा, शांत परीसर, पाण्याची उपलब्धता, वाहतुक सुविधा याबाबी महत्वाच्या आहेत. शाळेची इमारत, सांस्कृतिक सभागृह, विद्यार्थी व कर्मचारी निवास व्यवस्था, भोजनगृह, इनडोअर खेळांची व्यवस्था, मैदानी खेळांसाठी प्रशस्त क्रिडांगण, अंतर्गत रस्ते, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, प्राथमिक आरोग्य सुविधा कक्ष या सर्व सुविधांची निवासी शाळेसाठी आवश्यकता असते.

निवासी शाळांमध्ये सर्वांची दीनचर्चा-वेळापत्रक निश्चीत केलेले असते. सकाळी वेळेवर उठणे, प्रातःविधी आटोपणे, व्यायाम, सकाळचा नाष्टा, अभ्यासिका, भोजन, प्रार्थना, अध्ययन, दुपारचा नाष्टा, सांघिक व वैयक्तिक खेळांचा सराव, संध्याकाळचे भोजन, अभ्यासिका यासह वेळेवर झोपणे हे सारे दिवसाचे वेळापत्रक निश्चित वेळापत्रकाप्रमाणे व घंटेच्या आवाजावर शिस्तीचे पालन करत चाललेले असते.

**वसतीगृह व्यवस्था :-**

थोर महापुरूष, नदींची नावे दिलेले वेगवेगळ्या वर्गांचे निवास कक्ष मिळून विद्यार्थी वसतिगृह तयार असतात. शाळेच्या यादीप्रमाणे जीवनावश्यक व शालेय साहित्याने भरलेली सुंदर हस्ताक्षरात नाव लिहलेली पेटी घेवून विद्यार्थी दडपण घेत वसतिगृहात प्रवेश करतात. प्रवेशानंतरचे काही दिवस व सुट्टीनंतर एक-दोन दिवस कुटूंबाच्या आठवणीने डोळ्यात पाणी आणणारे काही क्षण बाजूला करत विद्यार्थी वसतिगृहाचा भाग बनून जातात. वसतिगृह विद्यार्थ्यांना एकता आणि एकात्मता, शिस्त, स्वावलंबन, स्वच्छता यांचे शिक्षण देत सर्वाधिक वेळ मुलांचा वसतिगृहात जातो. अभ्यासाबरोबर बैठे खेळ बुध्दिबळ, कॅरम यांनी विद्यार्थी-वसतिगृह नाते अधिक घट्ट होत जाते. वसतिगृहाची शिस्त व नाव जपण्याचे सांघिक कार्य आपोआप जबाबदारीत रूपांतरीत होते. स्वतःची कामे स्वतः करताना स्वतःचा बेड नीटनेटका ठेवतानाच स्वतःचे साहित्य व्यवस्थित ठेवण्याची सवय आयुष्यभर साथ संगत करत राहते. सुट्टीनंतर आणलेला किंवा पालक भेटीत दिलेला खाऊ सर्वांनी वाटून खाण्याची सवय मैत्री घट्ट करत राहते. वेळेवर उठण्यापासून वेळेवर झोपण्यापर्यंतची सवय सैनिकी शिस्तीप्रमाणे कायम सोबत राहते. विद्यार्थ्यांकडे असलेल्या विविध कौशल्यांचा आणि कलागुणांचा लाभ परस्परांना होत राहतो. परस्परांना दिल्या-घेतलेल्या लहान-लहान वस्तूंमुळे एकमेकांना मदत करण्याची भावना प्रबळ बनत जाते. धावपळीच्या क्षणांत, सुख-दुःखाच्या प्रसंगात एकमेकांना आधार देत मैत्री दृढ होत जाते. वसतिगृहातील हे मंतरलेले दिवस आणि स्वयंशिस्तीचे धडे आयुष्याला आकार देताना आधाराचे ठरतात.

**शाळा :-**

किमान पाच तास अध्यायनाचे कार्य चालू असणारी व मुख्य उद्देश अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थी घडविण्याची जबाबदारी शाळेची. प्रवेशद्वार, वर्गखोल्या, ग्रंथालय, बागबगीचा, सभागृह, व्हरांडा, कार्यालय, स्टाफरूम अशी रचना असलेली शाळा म्हणून आयुष्यभर अभिमान मिरवत राहते.

सकाळची प्रार्थना, दिवसभराचे विविध विषयांचे तास, मधल्या सुट्टीतील व्हरांड्यातील धावपळ, शेवटच्या तासाला विविध खेळांसाठीची लगबग आणि शाळा सुटल्याचा आनंद असा भरगच्च दिनक्रम चालु असतो. प्रार्थनेच्या वेळेची शिस्त, शांतता मन प्रसन्न करते. सामुदायिक प्रार्थनेच्यावेळी बातमी वाचन, राष्ट्रगीत अशा उपक्रमातून स्टेज धाडस व नेतृत्वाची संधी प्राप्त होते. शैक्षणिक स्पर्धा, क्रीडा स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा अशा स्पर्धेतील बक्षीस प्राप्त विद्यार्थ्यांचा सर्व विद्यार्थ्यांसमोरील सत्कार मनाला ताकद देत राहतो. शाळेचा बोलका व्हरांडा, वेगवेगळ्या उपक्रमांनी सजलेला नोटीस बोर्ड, गुणवत्ताप्राप्त माजी विद्यार्थ्यांचा बोर्ड, महान व्यक्तींच्या कार्याची, विचाराची ओळख करून देणारे फलक हे रोजच मनाला नवीन ऊर्जा देत राहतात. वर्गशिक्षक आणि विविध विषयांचे शिक्षक यांच्याकडून शिक्षणाबरोबर व्यक्तिमत्व घडविणारे उपक्रम नाते घट्ट करत जातात. कोणत्या विषयात कोणता विद्यार्थी हुशार याची चर्चा होत राहते. तर अंतीम परीक्षेत एखादा नवीन चेहरा गुणवत्ता यादीत स्थान मिळवत सर्वांना आश्चर्याचा धक्का देतो. मार्कांची स्पर्धा दुसऱ्या शाळेत प्रवेश घेईपर्यंत मागे-पुढे होत राहते. मधल्या फळीतील व मागच्या फळीतील खेळाडू माझा या स्पर्धेशी काही संबंध नाही अशा अविरभावात निवांत असतात. त्यांची पास होण्याची धडपडच त्यांना आनंद देते.

वेगवेगळ्या उपक्रमात भाग घेणारे विद्यार्थी, विविध स्पर्धांमध्ये शाळेबरोबर स्वतःचा नावलौकिक वाढवत राहतात. वर्गाच्या बाहेर मांडणी केल्याप्रमाणे ठेवलेली पादत्राणे, नीटनेटका पोशाख, वर्गातील स्वच्छता, अभ्यासाची आवड व एकाग्रता, हस्ताक्षर, वर्गात बोलण्याची सवय या बाबीपुढे आयुष्यभर अंगिकारल्या जातात. विद्यार्थी घडण्याची आणि घडविण्याची प्रक्रिया शाळेतच घडते. ग्रंथालय आणि प्रयोगशाळा माणूस आणि वैज्ञानिकदृष्टी घडविण्याचे कार्य करत राहतात. समृध्द ग्रंथालय विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करते. वाचनातील विचारांचा प्रभाव मनाची ताकद वाढवत जातो. अंधश्रध्दा निर्मूलन करत, वैज्ञानिक दृष्टीकोन जागृत करत, जनजागृती करत आधुनिक समाज निर्मितीचे कार्य शाळा करत असतात. समाजप्रबोधनाचे कार्य रॅली, प्रदर्शने, भित्तीपत्रके या माध्यमातून शाळा प्रभावीपणे करत असतात. चित्रकला, कार्यानुभव, संगीत हे विषय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात सहाय्य करतात.

शाळेजवळच्या परीसरात शांतता आणि सुव्यवस्था निर्माण करण्याची जबाबदारी प्रशासन व समाजाची आहे. त्याकडे होणारे दुर्लक्ष अहितकारक आहे. व्यसनमुक्त परीसर, अहितकारक खाद्य पदार्थ यांच्या विक्रीवर बंदी ही जबाबदारी सर्वांनी स्वीकारली पाहिजे. शाळा हेच संस्काराचे मुख्य केंद्र असून ते समाज घडविण्याचे प्रभावी माध्यम आहे.

**क्रीडांगण :-**

खेळ शरीराबरोबर मनाची सुदृढता वाढवतात. वेगवेगळ्या खेळांची प्रशस्त मैदाने ही विद्यार्थी आणि खेळाडू घडवितात. वैयक्तिक खेळांबरोबर सांघिक खेळाने संघ भावना वाढीस लागते. शाळेतील वार्षिक क्रीडास्पर्धा, तालुका व जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा, विद्यापीठ स्तरीय क्रीडा स्पर्धा, मुलांना प्रोत्साहन व प्रेरणा देतात. शरीरसंपत्ती सर्वश्रेष्ठ असून क्रीडांगणे ही त्याची महत्वाची आवश्यकता आहे. शालेय स्तरावर खेळाची आवड व खेळांचे प्रशिक्षण चांगले खेळाडू तयार करतात. निवासी शाळांमध्ये सर्व खेळांना प्राधान्य दिले जाते. सर्व खेळांची सुसज्ज मैदाने तयार केली जातात. त्यामुळे विविध स्पर्धांमध्ये निवासी शाळांच्या संघांचा व खेळाडूंचा दबदबा जाणवतो. स्वतंत्र क्रीडाशिक्षक व सुसज्ज क्रीडा विभाग याबाबत निवासी शाळांमध्ये चांगले नियोजन केलेले असते.

खेळाची मैदाने सार्वजनिक व्यवस्था म्हणून व्यायामासाठी, खेळासाठी जपली पाहिजेत. प्रत्येक गावात खेळाची मैदाने तयार करणे, प्रशस्त क्रीडांगण मुलांना खेळण्यासाठी प्रयत्नपुर्वक निर्माण केले पाहिजे. प्रत्येक शाळेत क्रीडाशिक्षक पद शासनाने भरलेच पाहिजे. क्रिकेट खेळाप्रमाणे सर्व सांघिक व वैयक्तिक क्रीडा प्रकारांना शासनाचे पाठबळ व सामाजिक सहकार्य मिळाले पाहिजे.

**भोजन गृह :-**

निवासी शाळांमध्ये मुलांना चांगला आहार मिळावा यासाठी नियोजन केले जाते. रोज वेगळा अल्पोपहार व भोजनामध्ये भाजी, फळे, डाळी, आवश्यकतेनुसार मांसाहार याचा समावेश करताना मुलांच्या आरोग्याची व पोषणाची गरज लक्षात घेतली जाते. रोज निश्चितवेळी नाष्टा व भोजन याची व्यवस्था केली असल्याने आरोग्याची काळजी घेतली जाते. भोजनापुर्वीची प्रार्थना, भोजनगृहातील एकत्र भोजन, स्वच्छता, आवश्यकतेनुसार अन्न वाटप यामुळे एक चैतन्यदायी वातावरण भोजनगृहात निर्माण झालेले असते. भोजनाबाबत जागृतता, अन्नाचे महत्त्व, एकत्र भोजनामुळे निर्माण होणारी एकता याबाबी विद्यार्थ्यांना अधिक प्रगल्भ करत राहतात.

**सांस्कृतिक सभागृह :-**

सांस्कृतिक सभागृह ही शाळांची व्यक्तिमत्व विकासाची आधार आहेत. प्रार्थनेसाठी सर्वजण एकत्र येणे, एकत्रित व्याख्यानांचे आयोजन, एकत्रित सूचना यासाठी सभागृहाचा वापर केला जातो. वार्षिक स्नेहसंमेलन हा मुलांच्या आवडीचा महोत्सव, यासाठी सभागृह आवश्यक असते. सभागृहाचे स्टेज मुलांमध्ये स्टेज डेअरींगसह नेतृत्व विकासात महत्वाचे ठरते. गायन, वादन, नाटिका, नृत्य, वक्तृत्व अशा विविध कलागुणांना वाव देण्यासाठी सादरीकरण व सराव यासाठी सभागृह गरजेचे असते. सत्कार समारंभासह सर्व मुख्य व महत्वाचे कार्यक्रम सभागृहात घेतले जातात. निवासी शाळांमध्ये दूरदर्शन व्यवस्था सभागृहात केली जाते. करमणुकीचे कार्यक्रम सभागृहात आयोजित केले जातात.

निवासी शाळांमध्ये अंतर्गत रस्ते, पाण्याची व्यवस्था, बाग-बगीचा, परीसर स्वच्छता व सुशोभीकरण, वृक्षलागवड या माध्यमातून आनंददायी परीसराची निर्मिती केली जात आहे. पोहण्याचा तलाव, घोडेस्वारी यासह आधुनिक क्रीडा व्यवस्था यांच्या निर्मितीस प्राधान्य दिले जात आहे. सुरक्षा व्यवस्था, सी.सी.टी.व्ही. नियंत्रण, संगणक प्रयोगशाळा, प्रयोगशाळा यासह चांगल्या सुविधांची निर्मिती प्रक्रिया हा शाळांचा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांच्या अपेक्षा, पालकांच्या अपेक्षा, शासनाच्या अपेक्षा यासह यशस्वी व नाविन्यपुर्ण संकल्पना राबविण्यासाठी व्यवस्थापन कार्यरत असते. व्यवस्थापकीय मंडळ, प्राचार्य, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे नियोजन व परीश्रम यावरच निवासी शाळांची गुणवत्ता व यशस्वीता अवलंबून असते. सकस आहार, प्राथमिक आरोग्य सुविधा यासह विद्यार्थी हिताची धोरणे राबवत शिक्षण व्यवस्थेतील स्पर्धेत आपले स्थान मजबूत करण्याचे कार्य निवासी शाळा करत आहेत.

सर्वगुणसंपन्न, चांगले विद्यार्थी घडविण्याचे कार्य करणाऱ्या व पुर्णवेळ विद्यार्थी विकासासाठी, हितासाठी कार्यरत असलेल्या या निवासी शाळा मजबुतीने उभ्या राहिल्या पाहीजेत. नवीन निवासी शाळा निर्माण झाल्या पाहीजेत. निवासी शाळा संस्काराची शिदोरी देणाऱ्या, विद्यार्थी घडविणाऱ्या मातृसंस्था आहेत. शिस्त, स्वावलंबन आणि संस्कार देणाऱ्या या शाळा जपल्या पाहीजेत.

निवासी शाळेत शिकून बाहेर समाजात विविध क्षेत्रात वावरणारे विद्यार्थी हे निवासी शाळेतील संस्काराची शिदोरी घेऊन कार्यरत आहेत.निवासी शाळेने दिलेले संस्कार त्यांना जीवनभर उपयोगी पडतात. या शाळांबद्दल हे विद्यार्थी कृतज्ञ असून आपआपल्या परीने माजी विद्यार्थी म्हणून शाळेस मदत करतात. या विद्यार्थ्यांना सहनशीलता, शिस्त, कार्यक्षमता, समाजाबद्दल आदरभाव ही शिकवण शाळेत मिळाली आहे. परस्परांना सहकार्य करणे, चांगल्या गोष्टींचा गौरव व पाठपुरावा करणे, सामाजिक सुधारणांना पाठबळ देणे, सार्वजनिक कार्यात सहजतेने सहभाग, विविध क्षेत्रात नेतृत्व करणे, शैक्षणिक सुधारणांना सहकार्य अशा कार्यात माजी विद्यार्थी हिरीरीने भाग घेतात. शाळेत व्यायाम, खेळ यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांचा सहभाग असल्याने त्यांच्याकडे खिलाडूवृत्ती जाणवते. शाळेत सर्वांगीण शिक्षण मिळालेले विद्यार्थी समाजात जबाबदार नागरिक म्हणून वावरताना दिसतात.

प्राथमिक, माध्यमिक शाळा हीच संस्काराची प्रमुख केंद्रं आहेत. शाळा हेच गावच्या, सामाजाच्या व कुटूंबाच्या विकासाचे मुख्य माध्यम आहे, त्यामुळे शाळेवरून गावाची ओळख निर्माण होईल यासाठी प्रयत्न करा. निवासी शाळा, महाविद्यालये यांना तालुक्याच्या विकासात महत्त्वाचे स्थान द्या. शहरांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले आहे आपणही ग्रामीण विभागात विकासाचा प्रमुख आधार म्हणूनच शिक्षण व्यवस्थेला प्राधान्य देणे आवश्यक आहे. शिक्षकांचा सन्मान, शिक्षणाला

प्रतिष्ठा, विद्यार्थी विकासाला प्राधान्य या प्रयत्नांतून शाळा ही संस्काराची शिदोरी बनवूया. संस्कारक्षम समाज घडविणे हीच राष्ट्राच्या विकासाची मजबूत वाटचाल आहे.

**समारोप**

निवासी शाळा स्वावलंबी विद्यार्थी घडविणारी शैक्षणिक केंद्र आहेत. या शाळांच्या निर्मितीत व संवर्धनात राजकीय प्रतिनिधी व शासकीय अधिकारी यांचा प्रत्यक्ष सहभाग महत्त्वाचा आहे. या शाळांमध्ये विद्यार्थी पुर्णवेळ शैक्षणिक वातावरणात राहत असल्याने त्यांचा विविधांगी विकास साधला जातो. विद्यार्थ्यांच्या विविध अंगभूत गुणांना चालना देण्याचे कार्य या शाळांमधून केले जाते. प्रत्येक जिल्ह्यात केंद्र शासन व राज्यशासन यांच्या माध्यमातून सैनिकी शिक्षण देणाऱ्या शाळा निर्माण केल्या जाव्यात. शासकीय विद्यानिकेतन व नवोदय स्कूल या धर्तीवर रचना असलेली पब्लीक स्कूल प्रत्येक तालुक्यात स्थापन करण्यात यावीत. अशा शासकीय शाळांना प्रशस्त जागा, पाण्याची व्यवस्था, अंतर्गत रस्ते, इमारतींसाठी निधी व सर्व सुविधा यांसाठी स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य व केंद्र सरकार यांनी समन्वयाने सहकार्य करावे. विद्यार्थी हे कुटूंब, समाज व पर्यायाने राष्ट्राचे पुढील काळात प्रतिनिधीत्व करणार असल्याने त्यांच्या शैक्षणिक प्रगती बरोबर सर्वांगीण विकासासाठी निवासी शाळांचा उपक्रम हितकारक आहे. स्वतःचे, कुटुंबाचे, जनतेचे व राष्ट्राचे कल्याण करण्याचे एक प्रमुख साधन म्हणून निवासी शाळेतील विद्यार्थी घडविण्याचे पवित्र कार्य या शाळा करत आहेत. शिक्षणाचा हेतू साध्य करणाऱ्या या निवासी शाळांना समाजातील सर्व घटकांनी सहकार्य केले पाहिजे. माणूस घडविण्याचे काम करणाऱ्या या शाळांना जपले पाहिजे.

**<u>संदर्भ ग्रंथ सूची :-</u>**

१) भारत सरकार, विधी व न्याय मंत्रालय, भारताचे संविधान.
२) प्रा. बी. बी. पाटील, फडके प्रकाशन, भारतीय शासन आणि राजकारण.
३) यशवंतराव चव्हाण, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, सह्याद्रीचे वारे.